# राशिभविष्य - डिसेंबर, २०१३.

दादा दामले(dadadamle@gmail.com)

===================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ सर्व प्रकारे प्रतिकुल असाच असल्याचा अनुभव येईल. त्यामुळे उदास, निराश न होता विपरीत काळाशी मुकाबला कसा करावयाचा याची योजना आखून त्यानुसार प्रतिकुल काळात वाटचाल केली पाहिजे. अशी परिस्थिती कधी ना कधी सर्वांच्याच वाट्याला येत असते. तसेच प्रतिकुल काळ कायमचा कधीच असत नाही. रात्रीच्या अंधारानंतर सकाळचा प्रकाश येतोच. म्हणून या प्रतिकुल काळात शांत व खंबीर मनाने अनुकुल काळात सर्वांगीण प्रगती कशी करावयाची त्याची योजना तयार करण्यात काळ व्यतीत करा व प्रतिकुल काळास धैर्याने तोंड द्या. आपल्या राशीस सर्वच ग्रह प्रतिकुल स्थानी असल्यामुळे मनासारखे काही घडले नाही तरी निराश होऊ नका. काळ अनुकुल नाही ही मनाची पक्की समजूत घालून सतत नम्रतेचे आचरण करा. असह्य मनस्तापामुळे शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडले नाही तरच नवल ! कुसंगतीपासून दूर राहा. घरीदारी, नोकरी-व्यवसायाच्या ठिकाणी सतत मनाविरुद्ध घटनाच घडतील. त्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे संभवते. शारीरिक उष्णता भडकून ताप येणे, अंगावर फ़ोड येणे, रक्तविकार होणे अशापैकी आजार होण्याची शक्यता दिसते. हृदयविकार असणारांनी तर  मन व विचारावर काबू ठेवला पाहिजे व शांत राहिले पाहिजे. आर्थिक नुकसान, आर्थिक घोटाळे, मिळणाऱ्या अर्थप्राप्तीस होणारा विलंब यांमुळे चिंता उत्पन्न होईल. महिन्याचा पहिला सप्ताह बरा जाईल; पण नंतरचा काळ मनस्ताप देणाराच असेल. केवळ गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना काळ थोडा अनुकुल होईल. काही मंडळींना प्रवासाचे योग येतील, तर काही साहित्यिकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. तसेच यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते, कलाक्षेत्रातील मंडळी यांना काळ थोडा अनुकुल व लाभदायक होईल. शनि-राहूमुळे वैवाहिक सुखातही विविध कारणांनी बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व शिवोपासना केल्यामुळे मन व बुद्धी शांत, स्थिर व सशक्त राहू शकेल.

**(२) वृषभ -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचा स्वभाव अत्यंत लहरी होण्याची शक्यता दिसते. वैवाहिक सुख व संततिसुख या दृष्टीने या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ अनुकुल नसल्याचाच अनुभव येईल. तसेच स्वत:चे व जीवनसाथीचे अनारोग्याकडे अधिक लक्ष द्यावे लागेलसे दिसते. ताप येणे, अपचन होणे, पोटविकार बळावणे, मनस्ताप देणाऱ्या घटनांचा त्रास होणे संभवते. जपा. जीवनसाथीशी वाद, भांडणे होणार नाहीत याची काळजी घ्या. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या मंगळामुळे संततिविषयक समस्या त्रस्त करतील. काही मुलांचे आजार, काहींचे मनाविरुद्ध आचरण यांमुळे मनस्ताप होईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. वकिली, सल्लागारी व्यवसाय, लोखंडी सामानाचे व्यापारी, परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध असणारे अशांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. द्रव पदार्थांचे व्यापारी व मानसोपचारतज्न्य यांनाही काही लाभदायक घटना घडत असल्याचा अनुभव येईल. त्यानंतर भाग्यस्थानी येणाऱ्या शुक्रामुळे काही मंडळींना प्रसिद्धी तर काहींना थोरामोठ्यांची कृपा प्राप्त होऊन काही लाभ होतील. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या हर्षलमुळे मित्रांशी वाद, भांडणे होणे संभवते. जपा. पण शुक्र-हर्षल शुभ योगामुळे या राशीच्या काही भाग्यवान मंडळींना अनपेक्षितपणे धनलाभ होणेही संभवते. धनस्थानी असलेल्या गुरुमुळे कुटुंबात शुभ घटना घडतील व आर्थिक चिंता करावी लागणार नाही. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल.

**(३) मिथुन -** या राशीच्या सर्व प्रकारच्या बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना या महिन्याचा काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना मात्र महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे सात्विक सुखशांती लाभेल. काहींना सूचक स्वप्ने पडतील तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी शत्रुराशीचा मंगळ असल्यामुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्य मिळणे कठिण दिसते. कुटुंबातील सदस्यांमध्ये गैरसमज, भांडणे होणे, राहत्या जागेबाबत समस्या निर्माण होणे, स्थावर संपत्तीबाबत वाद भडकणे अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या शनि-राहूमुळे संततिविषयक समस्या त्रस्त करतील. मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाचे गैर आचरण, कोणास आलेले नैराश्य अशा विविध कारणांनी या राशीच्या मंडळींना अपेक्षित संततिसुख लाभण्याची शक्यता दिसत नाही. दलाली, कमिशनवर व्यापार-व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ

अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात वैवाहिक जीवनात अकारण मनस्तापदायक घटना घडतील. त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणेही संभवते. शुक्राच्या अनुकुलतेमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अकस्मात प्राप्तीचा योग आहे अशापैकी काहींना भूमी, धन, मानसन्मान अशापैकी काही ना काही लाभ होण्याची दाट शक्यता आहे. श्रद्धेने नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींना महिन्याचा पूर्वार्ध नोकरी-व्यवसायात मनस्ताप देणारा असल्याचाच अनुभव येईल. महिन्याच्या उत्तरार्धात मात्र परिस्थिती बदलेल व मनोनुकुल घटना घडतील. शुक्र-शनि-राहू अशुभ योगामुळे दांपत्यजीवनातील सुखात, कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात विविध कारणांनी बाधा येण्याची शक्यता आहे. जपा. तसेच संततिसुखातही बाधा येणे संभवते. अशा परिस्थितीत अध्यात्मात रस असणारांना मात्र उपासनेद्वारे मन शांत व स्थिर ठेवणे शक्य होईल. मंगळ-शुक्र शुभ योगामुळे यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या मंडळींनी सध्या हातचे सोडून नवीन काही करण्याचा विचारही करू नये. आहे ती नोकरीच मनापासून करावी. पाण्यापासून धोका असून विषभयही संभवते. जपा. सामाजिक कार्याची आवड असणारांना त्यांच्या कार्यात प्रगती करणे शक्य होईल व अध्यात्माची मनापासून ओढ असणारांना उपासनेद्वारे सात्विक मन:शांती लाभेल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या हर्षलमुळे शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना संशोधन कार्यात प्रगती होत असल्याचा आनंद मिळेल. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योगही संभवतात. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीत अडथळा येऊ नये यासाठी सर्व प्रकारच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल. तसेच मन व बुद्धी स्थिर राखता आली पाहिजे. आपली राशी गुरु ग्रहाची उच्च राशी असल्याने गुरुची उपासना अनुकुल व लाभदायक होईल. नियमितपणे श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ अनुकुल-प्रतिकुल असे संमिश्र स्वरूपाचे अनुभव देणारा असणार आहे, असेच म्हणावे लागेल. अनारोग्य, आर्थिक समस्या, कौटुंबिक त्रास, प्रिय जनांपासून दुरावा अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. मनस्तापामुळेच शारीरिक उष्णता भडकून उष्णतेचे विकार बळावतील. घसा, मान, दाढा यांचे आजार, डोळ्याचे आजार त्रस्त करतील. जपा. सांसारिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी या

राशीच्या काही मंडळींना अपार कष्ट-परिश्रम करावे लागतील. काहींच्या जीवनात अकस्मात आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्याची जबाबदारी येऊन पडेल. देणे द्यावेच लागेल; पण येणे पदरात पडेल की नाही याची चिंता निर्माण होईल. कौटुंबिक गैरसमज, भांडणे यांमुळे मनस्तापात भरच पडेल. नोकरीत वरिष्ठांच्या विरोधास तोंड द्यावे लागेल. तसेच मुलांपैकी कोणाचे आजार, कोणाची अन्य समस्या यांकडेही लक्ष द्यावे लागेल. काहीही कारणाने अपेक्षित वैवाहिक सुख मिळेलच याची खात्री देता येत नाही. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या हर्षलमुळे घरीदारी सर्व ठिकाणी सावधानतेनेच आचरण करा. वाहने विचाराच्या तंद्रीत चालवू नका. अपघात भय आहेच. जपा. गुरु-शनि-राहू शुभ योगामुळे या राशीच्या काही कर्तबगार मंडळींना अपेक्षित अशी नवी नोकरी वा नवे कार्यक्षेत्र मिळेल. वकिली, सल्लागारी व्यवसाय, अन्य चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. कुलदेवतेची उपासना अनुकुल होईल व दिलासा मिळेल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना अद्याप एक वर्षाचा काळ शनि ग्रहाच्या साडेसातीचा त्रास सहन करावा लागणार आहे. शत्रु ग्रहाच्या राशीतील मंगळ लग्नी असल्यामुळे स्वभाव तापट, हेकेखोर, अहंकारी, उद्धट, हट्टी, मानापमान फ़ार असणारा असा होणे संभवते. त्यामुळे निरर्थक शरीरपीडा, दगदग, श्रम सहन करावे लागतील. नोकरी-व्यवसायातही प्रतिकुल परिस्थितीस तोंड द्यावे लागेल. त्यामुळेच सर्व प्रकारचे अनारोग्य होणेही संभवते. जपा. मनावर व बुद्धीवर ताबा ठेवा. सहनशील व्हा. प्रतिकुल परिस्थितीला नम्रतेने सामोरे जा. तरच कमी मनस्ताप होईल व अनारोग्यही फ़ारसे होणार नाही. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होईल. म्हणून या काळात जे काही साध्य करावयाचे असेल ते साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करा. पण छुप्या शत्रूंपासून सावध राहा. बौद्धिक कार्यक्षेत्र, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र, शिक्षणक्षेत्र अशापैकी कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिशील, यशदायक व लाभदायक होईल. महिन्याच्या प्रथम सप्ताहानंतर गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. नेपच्यूनमुळे या राशीच्या काही मंडळींना उगीचच काही आजार झाल्याची भावना त्रस्त करील. सप्तम स्थानी असलेल्या हर्षलमुळे दांपत्यजीवनात वाद, मतभेद, भांडणे यांमुळे सुखसमाधान लाभणे अशक्य होईल. जपा. अपघातभय आहे. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना व हनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात शनि-रवि-मंगळ-राहू हे चार ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. पण रवि ग्रह मात्र महिन्याच्या पूर्वार्धातच प्रतिकुल होईल. शनि-राहूमुळे शारीरिक अनारोग्य, नैराश्य, हाती घेतलेल्या कार्यात अडथळे, अडचणी निर्माण होणे, जीवनसाथीचे अनारोग्य, कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. राहूमुळे अपमानास्पद प्रसंगांना तोंड द्यावे लागेल. रविमुळे महिन्याच्या पूर्वार्धात आर्थिक फ़सवणूक होणे, खर्च वाढणे संभवते. तसेच आप्तेष्टांशी भांडणे होणे संभवते. त्याचप्रमाणे डोळ्यांचे अनारोग्य त्रस्त करील. व्यय स्थानी असलेल्या शत्रुराशीतील मंगळामुळे सतत मनस्तापदायक घटना घडतील. जुनी दबलेली प्रकरणे असतील तर त्यांचा पुन्हा त्रास होणे संभवते. मानहानी व आर्थिक नुकसान होणे संभवते. शेतीचा व्यवसाय असणारांना काळ लाभदायक होईल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे सात्विक सुखशांती लाभू शकेल. षष्ठ स्थानी असलेल्या हर्षलमुळे मन व बुद्धी चंचल होईल. काही मंडळींना मुदतीचे ताप तर काहींना डोकेदुखीचा किंवा मेंदूविकाराचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. सप्तम स्थानी असलेल्या केतूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात थोडी बाधा येणे संभवते. त्यामुळे काही मंडळींना वैराग्य येणे शक्य आहे. जपा. कोर्ट प्रकरणे असतील तर त्यात अपयश टाळण्यासाठी ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. भाग्यस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे आध्यात्मिक उपासनेत प्रगती होईल. सद्‌गुणांचा विकास होईल. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व सात्विक सुखशांती लाभेल.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात रवि-शनि हे दोन पितापुत्र ग्रह प्रतिकुल असणार आहेत. काळ शनि ग्रहाच्या साडेसातीचाच आहे. पण शनि स्वत:च्या उच्च राशीत असल्यामुळे त्रासाचे प्रमाण थोडे कमी होईल, असे वाटते. तरीही सांगावेसे वाटते की काळ अनुकुल नसल्याने सतत सावधानतेने आचरण करा व मन व बुद्धी शांत व स्थिर राखण्याचा प्रयत्न करा. आर्थिक व्यवहारात नुकसान होणार नाही वा फ़सवणूक होणार नाही याची काळजी घ्या. मनस्ताप, मानहानी होणारच हे गृहित धरूनच प्रतिकुलतेला सामोरे जा, म्हणजे मनस्तापाचे काही वाटणार नाही. या राशीच्या काही मंडळींच्या अहंकारी स्वभावामुळे अकारण पोलिसांचा ससेमिरा मागे लागण्याची शक्यताही जाणवते. जपा. असह्य मनस्तापामुळे शारीरिक अनारोग्य होणेही शक्य आहे. जपा. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर मन व विचारशक्ती स्थिर व शांत राखण्याचा कटाक्षाने प्रयत्न केला पाहिजे. महिन्याच्या उत्तरार्धात आर्थिक

फ़सवणूक, आर्थिक चिंता, गैरसमज, आप्तेष्ट भांडणे होणे संभवते. जपा. नपेक्षा उष्णता भडकून नेत्रविकार बळावतील. कष्ट-परिश्रमानेच अपेक्षित अर्थप्राप्ती होणे संभवते. मित्रांशी वितुष्ट येणार नाही याची काळजी घ्या. भाग्यस्थानी असलेल्या मंगळामुळे काही मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे शक्य आहे; तर ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग आहेत अशापैकी काही मंडळींना अचानक धनलाभ वा वारसा हक्काने धन मिळणेही संभवते. हर्षलमुळे उच्च बौद्धिक व कलात्मक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. श्रद्धेने श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना करा. हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींचे मन या महिन्याच्या काळात अत्यंत भावनाशील होणे संभवते. त्यातच विचारशक्ती चंचल व अस्थिर होण्याची शक्यता असल्यामुळे या राशीच्या मंडळींची विचित्र अवस्था होणे संभवते. त्याचा त्यांना स्वत:लाच त्रास होऊ शकेल. रवि-बुध हे दोन ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे शारीरिक अनारोग्य व मानसिक अस्वस्थता सहन करावी लागेलसे दिसते. अशा परिस्थितीत कोणाशी न पटणे, आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान न लाभणे असे काही घडण्याची शक्यता दिसते. ही गुरु ग्रहाची राशी अध्यात्माला अनुकुल असल्यामुळे उपासनेद्वारे मन व बुद्धी शांत व स्थिर रखणे सहज शक्य होईल. या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग संभवतात. मुलांपैकी कोणाचे आजारपण किंवा कोणाला काही कारणाने आलेले नैराश्य यामुळेही चिंता निर्माण होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात काही कारणाने अडथळे येणे संभवते. जपा. दशम स्थानी असलेल्या शत्रु राशीतील मंगळामुळे नोकरी-व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता जाणवते. पण वकिली, सल्लागारी व्यवसाय, चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, शिक्षणक्षेत्र, अकौंटन्सी असे कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या अधिकारी मंडळींना सहज वाममार्ग धन मिळणे शक्य असले तरी त्यांनी हा मोह टाळावाच. तेच सुखाचे होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे विवाहेच्छूंना विवाहयोग येणे शक्य आहे. श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना बढती, पगारवाढ, अधिकारपद, असे काही मिळू शकेल. खाजगी नोकरीत असणारांनाही वरीलपैकी काही लाभ मिळण्याची शक्यता आहे.

महिन्याच्या उत्तरार्धात मात्र परिस्थिती बदलेल. मनाविरुद्ध  घटना घडणे, मानहानी होणे, त्यामुळे नैराश्य येणे, आर्थिक चिंता उत्पन्न होऊन अस्वस्थ व्हाल. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने परिस्थिती अटोक्यात राहील. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना कठिण समस्या सोडविण्यात यश येईल. काही मंडळींना परदेशगमनाचे योगही येतील. वकिली, सल्लागारी व्यवसाय, कोळसा, लोखंडी सामान विक्रेते यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण दिनांक २७-२८ हे दोन दिवस मनस्ताप देणारे ठरण्याची दाट शक्यता दिसते. जपा. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. वैचारिक मतभेदामुळे, गैरसमजामुळे किंवा अन्य कारणाने गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानावर शनिची पूर्ण दृष्टी असल्याने वैवाहिक जीवनातील सुखात विविध कारणांनी थोडी बाधा येणे शक्य दिसते. जपा. स्वत:चे सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहील पण त्यासाठी मन प्रसन्न व बुद्धी, विचारशक्ती शांत राखता आली पहिजे. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. पण त्यांना सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल. श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींचे मन अतिशय कोमल झाले असल्यास मानसिक संवेदनाही शीघ्र होत असतील. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच नैराश्य येत असेल, असे वाटते. त्याचबरोबर वाचा स्थानातील हर्षलमुळे स्वभावही अत्यंत लहरी, अस्थिर व चंचल होणे संभवते. कोणाचाही धाक वा कसलेही दडपण सहन होत नसावे, असे वाटते. अशा परिस्थितीत जिभेला लगाम घालून व मौन व्रत धारण करून काळ कंठता आला तर तेच सुखाचे होईल. नपेक्षा आपल्याकडून आपलेच प्रिय जन आपल्या फ़टकळ बोलण्याने दुखावले जातील. तसेच आपले वर्तमान आचरणही थोडे विचित्र होत असावे, असे वाटते. यासाठी थोडे अध्यात्माकडे लक्ष दिलेत व मनापासून उपासना केलीत तर मन व विचारशक्ती शांत, स्थिर होण्यास मदत होईल आणि शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने घरीदारी सुखशांती लाभू शकेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अतिशय अनुकुल आहे. मात्र मन शांत व बुद्धी स्थिर राखून मनापासून अध्ययन करणे जमले पाहिजे. प्रेमसंबंध व स्नेहसंबंध जुळून येण्यासही काळ अनुकुल आहे. पण शत्रुराशीतील अष्टम स्थानी असलेल्या मंगळामुळे अनारोग्य होणे, शारीरिक मानसिक कष्ट-परिश्रम होणे संभवते. तसेच अपघातभयही आहे. जपा. राहूमुळे वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे शक्य दिसते. जपा. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना

संपूर्ण महिन्याचा काळ लाभदायक होईल. श्रीहनुमंताची उपासना व हनुमानचालिसा स्तोत्राचे नियमित पठण अनुकुल होईल व मनाला दिलासा मिळेल.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या उत्तरार्धापेक्षा महिन्याचा पूर्वार्धच अधिक प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. या महिन्याच्या प्रारंभापासूनच या राशीच्या मंडळींचा स्वभाव अस्थिर, चंचल, हट्टी, हेकेखोर, कोणाचा धाक वा दडपण सहन न होणारा असा घडण्याची शक्यता आहे. या राशीची लहान मुले तर नेहमीपेक्षा अधिकच हूडपणा व व्रात्यपणा करत असल्याचा अनुभव त्यांच्या पालकांना येईल. असे असले तरी उच्च शास्त्रीय संशोधन कार्यास हा हर्षल अनुकुल व यश देण्यास समर्थ असेल. नेपच्यूनही चिंता, मानसिक व्यग्रता, नैराश्य देणारा असला तरी तो गुप्त पोलीसखात्यात कार्यरत असणारांना अनुकुल व उपयुक्त होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेला मंगळ वैवाहिक जीवनात कटकटी, वाद, भांडणे होण्यास कारणीभूत होईल. तसेच जीवनसाथीचे अनारोग्यासही तोच जबाबदार असेल. या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी भागीदारीत काहीही कारणाने बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रकरणात अपयश येणे संभवते. महिन्याचा उत्तरार्ध नोकरदार मंडळींना व बौद्धिक आणि शैक्षणिक कार्यक्षेत्र असणारांना विविध प्रकारचे लाभ देणारा व सुखसमाधान देणारा असाच असल्याचा सिद्ध होईल. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. काही मंडळींना स्थावर खरेदीविक्रीतून लाभ होतील. पण नातेवाईक मंडळींचा त्रास होणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरु दत्तात्रेयाची उपासना मनाला शांती व दिलासा देईल. नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

=====ooooo=====